अधिसंख्य पदावरील श्रीम हिराबाई किसन गायकवाड,
आरोग्य सेवक महिला, यांच्या नियुक्तीस मुदतवाढ
देण्याबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आरोग्य विभाग
आदेश क्रमांक आवि/कार्या-2/आस्था-4/182/2025
दिनांक 24/02/2025

वाचा - 1. महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.बीसीसी-2018/ प्र.क्र.308/ 16-ब दिनांक 21 डिसेंबर 2019
2. महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.बीसीसी-2019/ प्र.क्र.581ए / 16-ब दिनांक 14 डिसेंबर 2022
3. या कार्यालयाकडील आदेश क्र. आवि/कार्या-2/आस्था-4/ 845/2023 दि.12/12/2023
4. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-1124/प्र.क्र.45/आरक्षण-2(16-ब) दिनांक 07 मे 2024

ज्याअर्थी, श्रीम हिराबाई किसन गायकवाड, आरोग्य सेवक महिला,प्राथमिक आरोग्य केंद्र खर्डा, ता जामखेड, जि अहिल्यानगर यांचे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र जात पडताळणी समिती नाशिक यांनी त्यांचे आदेश क्र.3/522/ser/022017/107891 दि.14/10/2022 अन्वये त्यांचे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले आहे.

ज्याअर्थी श्रीम हिराबाई किसन गायकवाड, आरोग्य सेवक महिला, यांनी त्यांचे अनुसूचीत जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविण्याच्या जात पडताळणी समितीच्या दि.14/10/2022 च्या निर्णयाच्या विरोधात माननीय न्यायालयात याचिका दाखल केली आहे व ज्याअर्थी त्यांच्या प्रकरणी माननीय उच्च न्यायालयाने किंवा माननीय सर्वोच्च न्यायालयाने जात प्रमाणपत्र अवैध ठरविण्याच्या समितीच्या निर्णयास कोणतीही स्थगिती दिली नाही.

ज्याअर्थी, मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल पिल क्र.8928/2015 (चेअरमन ॲन्ड मॅनेजिंग डायरेक्टर, एफसी आय आणि इतर विरुध्द बलाराम बहिरा व इतर) व इतर याचिका यामध्ये दि.06 जुलै 2017 रोजी जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना सेवेत संरक्षण देय ठरत नाही, असा निर्णय दिला आहे.

ज्याअर्थी, शासन निर्णय क्र.बीसीसी-2018/ प्र.क्र.308/16-ब दिनांक 21 डिसेंबर 2019 अन्वये शासन निर्णय क्र.बीसीसी-1094/प्र.क्र.68/94/16-ब दि.15 जून 1995, शासन निर्णय क्र.बीसीसी-004/प्र.क्र.45/04/16-ब दिनांक 24 जून 2004, शासन निर्णय क्र.बीसीसी-2002/प्र.क्र.93/04/16-ब दि. 30 जुलै 2013, शासन परिपत्रक क्र.बीसीसी-2015/प्र.क्र.276 A/16- ब दि.21 ऑक्टोंबर 2015 अधिक्रमित ठरविण्यात आलेने श्रीम हिराबाई किसन गायकवाड, आरोग्य सेवक महिला, यांच्या सेवा शासन निर्णय क्र.बीसीसी 2018/प्र.क्र.308/16-ब दिनांक 21 डिसेंबर 2019 अनुसार या कार्यालयाचे आदेश दिनांक 12/12/2023 चे आदेशान्वये अधिसंख्य पदावर वर्ग केल्या आहेत.

त्याअर्थी, श्रीम हिराबाई किसन गायकवाड, आरोग्य सेवक महिला, यांना शासन निर्णय क्रमांक बीसीसी-2019/प्र.क्र.581 ए/16-ब दिनांक 14 डिसेंबर 2022 मधील तरतुदीनुसार मानवतावादी दृष्टीकोनातून व त्यांनी केलेल्या सेवेचा विचार करुन 1 दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुन्हा 11 महिन्यांच्या कालावधीकरीता त्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत सुरु ठेवण्यात येतील.

आता श्रीम हिराबाई किसन गायकवाड, आरोग्य सेवक महिला, यांच्या अधिसंख्य पदांवरील नियुक्तीला अधिसंख्य पदावरील दिनांक 12/12/2023 पासुन 11 महिन्यांचा कालावधी दिनांक 11/11/2024 रोजी संपुष्टात आल्यानंतर दिनांक 12/11/2024 रोजीचा एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून दिनांक 13/11/2024 पासून पुढील 11 महिने किंवा त्या सेवेत राहिल्या असत्या तर त्या ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाल्या असत्या त्या दिनांकापर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

श्रीम हिराबाई किसन गायकवाड, आरोग्य सेवक महिला, प्राथमिक आरोग्य केंद्र खर्डा, ता जामखेड, जि अहिल्यानगर यांच्या वेतनावर होणारा खर्च संबंधित कार्यालयाच्या आहरण व संवितरण अधिकारी यांनी वेतनासंबधीच्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा आणि संबंधित वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातुन भागवावा.

श्रीम हिराबाई किसन गायकवाड, आरोग्य सेवक महिला, यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करण्यापुर्वी त्यांना जेवढे मासिक वेतन व भत्ते मिळत होते. तेवढे वेतन व भत्ते त्यांना पुढील आदेश होईपर्यंत देण्यात येईल.

श्रीम हिराबाई किसन गायकवाड, आरोग्य सेवक महिला ,यांना शासन निर्णय क्रमांक बीसीसी-2019/प्र.क्र.581 ए/16-ब दि.14 डिसेंबर 2022 नुसार सेवा विषयक तसेच सेवा निवृत्तीचे लाभ देण्यात यावेत. यामध्ये पदोन्नती व अनुकंपा धोरण याचा लाभ मिळणार नाही.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक 202502241000050 असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 24-02-2025 16:25:31

(आशिष येरेकर, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्रीम हिराबाई किसन गायकवाड, आरोग्य सेवक महिला,प्राथमिक आरोग्य केंद्र खर्डा, ता जामखेड, जि अहिल्यानगर

द्वारा
वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र खर्डा, ता जामखेड, जि अहिल्यानगर

प्रत - वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र खर्डा, ता जामखेड, जि अहिल्यानगर
2/- उपरोक्त नमुद कर्मचारी यांना सदर आदेशाची प्रत बजावून त्यांची दिनांकित घेतलेली पोहच तात्काळ इकडेस सादर करावी.

प्रत – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर

(आशिष येरेकर, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर